MHRG190012062023

:: <u>विशेष दिवाणी दावा क्र.९५/२०२३ मधील निशाणी क्रमांक ९१ खालील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.४ यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व वादीने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रतिवादी क्र.४ चे कथन की, ते कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने आणि आजारी असल्याने नेमलेल्या तारखेस हजर राहु शकले नाहीत. प्रतिवादीतर्फे अतिरिक्त कैफियत दाखल होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादीने जाणीवपुर्वक व कोणत्याही गैरहेतुने सदर दाव्याकामी गैरहजर व विलंब केलेला नाही. प्रतिवादीची कैफियत दाखल झाल्यास दाव्याच्या गुणदोषांवर निर्णय होण्यास सोयीचे होईल. प्रतिवादीचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा गुणदोषांवर निर्णय होण्यास मदत होईल. नैसर्गिक न्यायतत्वाने सदरचा अर्ज मंजुर करुन प्रतिवादी क्र.४ विरुध्द दुरुस्ती दाव्यावर दिनांक ०७.०४.२०२५ रोजी विनाकैफियत झालेला आदेश रद्द होऊन प्रतिवादीस दुरुस्त दाव्यावर कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

४. वादींनी प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे देऊन विरोध दर्शविला. त्यांचे कथन असे की, त्यांनी दाव्यात दुरुस्ती खुप कालावधीपुर्वी केलेली असताना प्रतिवादी क्र.४ यांनी वेळेत अतिरिक्त कैफियत दाखल न करता वेळकाढुपणा केलेला आहे. तसेच जाणीवपुर्वक उशीराने कैफियत देण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादीने अर्जात योग्य व सबळ कारण

दिलेली नाही. प्रतिवादीने आजारपणाबाबत कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. याकारणास्तव अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०५. अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा दावा खरेदीखत रद्दबातल ठरविणेकरिता व निरंतर ताकीदीसाठी दिलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.४ यांची अतिरिक्त कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादीविरुध्द प्रकरण विना कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन करण्याकामी न्यायालयाचा बहुमुल्य वेळ वाया गेला आहे तसेच वादी यांनादेखील प्रतिवादीच्या कृत्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागल्याने वादीवर खर्चाची रक्कम बसवणे उचित वाटते. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ विरुध्द दिनांक ०७.०४.२०२५ रोजी पारित झालेला अतिरिक्त विना कैफियत आदेश वादीस कॉस्ट रक्कम रुपये १०००/- देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो व दाव्यास अतिरिक्त कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.03 13:19:56 +0530

महाड (एच. आर. जाधव)

दिनांकः०३.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, महाड

दिनांक ०३.०१.२०२६